CNR-MHSN020018382019

# विशेष दरखास्त क्र.३०/२०१९ मधील
# नि.७४ खालील आदेश

(सी.आर. कन्स्ट्रक्शन विरुध्द महाराष्ट्र जीवन प्राधीकरण)

(१). अर्ज वाचला, ऋणकोचे म्हणणे वाचले. प्रकरणाचा संपुर्ण अभिलेख वाचण्यात आला.

(२). थोडक्यात प्रस्तुत अर्जात धनकोचे कथन आहे की, कार्यकारी अभियंता/अधिक्षक, अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलभवन, टाटा पेट्रोल पंपासमोर, सांगली यांना साक्षी समन्स काढुन येताना शिट नं.१८३ सिटी सर्व्हे नं.१३३२३ या मिळकतीचा उतारा, नकाशा, या मिळकतीमध्ये असलेल्या पाण्याच्या टाकीसंबंधी मनपाशी केलेले कराराचे कागदपत्र (टाकीचे पाणी मनपाला वापरण्यास देण्यासाठी काही भाडे करारपत्र झाले असल्यास ते), या मिळकतीचे गर्व्हमेंट अप्रुव्हड व्हॅल्युअरकडुन अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन केलेले मुल्यांकन इ. कागदपत्रे आणावयाचा हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

(३). तसेच धनकोने मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई, बेलापूर सिटीडी यांना समन्स काढुन ऑडिटेड बॅलन्सशीट, ऑडिट रिपोर्ट, (वित्तीय वर्षे २०१९-२० किंवा २०२०-२१), मजीप्रा च्या सर्व प्रमुख बँक खात्यांचे दि.१५/०१/२०२२ च्या अखेर असलेल्या बॅलन्ससह तपशील (अकाऊंट नंबर, IFSC Code, Name of Bank, Account details Saving or Current, Title of account etc.), मजीप्राच्या सर्व ठेवींचे डिटेल्स (Account No., F.D.No., purpose of F.D. etc.), मजीप्राच्या सर्व असेट्सची सविस्तर माहिती (मूल्यांकन, लोकेशन, सर्व्हे नं./प्रॉपर्टी नंबर) इत्यादी दाखल करण्याचा आदेश करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

(४). ऋणकोने प्रस्तुत अर्जास नि.८४ वर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. प्रस्तुत अर्जात साक्षी समन्स काढण्यासाठी संयुक्तिक कारण नमुद नाही. अर्ज परिच्छेद क्र.२-अ मधील मिळकत, पाण्याची टाकी, मूल्यांकन इत्यादी मुळ दाव्याचा विषय नाही. यापुर्वीच नि.३३, नि.५९ व नि.६१ वर आदेश झालेले आहेत. ऋणकोने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

(५). प्रस्तुत अर्जात धनकोने कार्यकारी अभियंता/अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलभवन, टाटा पेट्रोल पंपासमोर, सांगली यांना साक्षी समन्स काढण्याची विनंती केली आहे परंतु सीट नं.१८३ सिटी सर्व्हे नं.१३३२३ ही मिळकत ऋणको नं.१ ते ६ यांच्या मालकीची आहे असे या अर्जात धनकोचे कथन नाही. ऋणको नं.१ ते ६ यांचे अथवा त्यापैकी कोणाचेही त्या मिळकतीचे मालक आहे असे कथन धनकोकडुन केले असते तर धनकोच्या मागणीप्रमाणे कार्यकारी अभियंता/अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलभवन, सांगली यांना या अर्जात मागितलल्याप्रमाणे समन्स काढता आले असते. त्यामुळे त्यांना तसे समन्स काढता येणार नाही व ते योग्यही होणार नाही.

(६). या अर्जात मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई, बेलापूर सीडीटी यांना जे साक्षी समन्स काढण्याबाबतचा मुद्दा आहे त्याचा विचार करता ऑडिटेड बॅलन्सशीट, ऑडिट रिपोर्ट, (वित्तीय वर्षे २०१९-२० किंवा २०२०-२१), मजीप्रा च्या सर्व प्रमुख बँक खात्यांचे दि.१५/०१/२०२२ च्या अखेर असलेल्या बॅलन्ससह तपशील (अकाऊंट नंबर, IFSC Code, Name of Bank, Account details Saving or Current, Title of account etc.), मजीप्राच्या सर्व ठेवींचे डिटेल्स (Account No., F.D.No., purpose of F.D. etc.), मजीप्राच्या सर्व असेट्सची सविस्तर माहिती (मूल्यांकन, लोकेशन, सर्व्हे नं./प्रॉपर्टी नंबर) हे सर्व ऋणको नं.१ ते ६ यांच्या संबंधीत आहेत असेही या अर्जात नमुद नाही. धनकोचे स्पष्टपणे या अर्जात नमुद सीट नं.१८३ सिटी सर्व्हे नं.१३३२३ ही ऋणको नं.१ ते ६ यांची अथवा त्यापैकी कोणाची तरी मालकी आहे अथवा या अर्जाच्या परिच्छेद (ब) मध्ये नमुद केलेली माहिती ही ऋणको नं.१ ते ६ यांच्या संबंधीत आहे असे कथन नाही, त्यामुळे अर्ज हा संदिग्ध असल्यामुळे तो नामंजुर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. खर्चाबद्दल आदेश नाही.

Lagamana Dundappa Huli
Digitally signed by Lagamana Dundappa Huli
Date: 2022.03.03 12:04:00 +05'30'

सांगली. (एल.डी.हुली)
दि.०२/०३/२०२२. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, सांगली

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | G.S.Parve |
| Court | : | Civil Judge Sr.Dn., Sangli |
| Date | : | 02/03/2022 |
| Signed by the Presiding Officer on | : | 02/03/2022 |
| Uploaded on | : | 03/03/2022 |